# घटक : उच्च न्यायालय

⇒ स्थान : सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणांतर्गत पण दुय्यम न्यायालयांच्या वर. } राज्याच्या न्यायप्रणालीत सर्वात श्रेष्ठ.

⇒ १८६२ ⇒ कलकत्ता, मुंबई आणि मद्रास उच्च न्यायालयांची स्थापना.
कलकत्ता उच्च न्यायालय → 1 जुलै 1862
मुंबई उच्च न्यायालय ⇒ 14 ऑगस्ट 1862
मद्रास उच्च न्यायालय ⇒ 15 ऑगस्ट 1862

⇒ १८६६ ⇒ अलाहाबाद येथे ४ थे उच्च न्यायालय.

→ १९५० — नंतर प्रांतात असलेले उच्च न्यायालय राज्याचे न्यायालय बनले.
प्रत्येक राज्यात उच्च न्यायालय असेल — घटनेत उल्लेख
दोन किंवा अधिक राज्यांसाठी आणि संघराज्य प्रदेशांसाठी संसदेला संयुक्त न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार — सातवी घ. दु. १९५६

* सध्या देशात २४ उच्च न्यायालये - पैकी 3 संयुक्त : ⟶ मुंबई / चंदीगड / गुवाहाटी.
* दिल्ली - एकमेव संघराज्य प्रदेश - उच्च न्याया. १९६६ पासून.
* उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात संघराज्य प्रदेश समाविष्ट करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार संसदेला.

⇒ राज्यघटनेतील भाग ६ मधील कलम २१४ ते २३१ - उच्च न्याया. संदर्भात.

## संरचना

एक मुख्य न्यायाधीश (स्वतंत्र व संयुक्त दोन्हींसाठी) व इतर न्यायाधीश.
इतर न्यायाधीशांची संख्या राष्ट्रपती ठरवितो. — विवेकाधिकार.

## न्यायाधीशांची नियुक्ती :

उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतो (भारताचा सरन्यायाधीश व संबंधित राज्याचा राज्यपाल यांच्याशी विचारविनिमय करून)
इतर न्यायाधीशांची नियुक्ती - राष्ट्रपती (मुख्य न्यायाधीशाशी विचारविनिमय)
संयुक्त उच्च न्यायालयाच्या बाबतीत सर्व राज्यपालांशी विचार विनिमय.

१९९३ च्या खटल्यात सर्वोच्च न्याया. निकाल ⇒ भारताच्या सरन्यायाधीशांची संमती असल्या-शिवाय उच्च न्याया. न्यायाधीशपदी नियुक्ती करता येत नाही.

१९९८ ——— " ——— ⇒ या संदर्भात सरन्यायाधीशाने सर्वोच्च न्याया-लयाच्या दोन सर्वात श्रेष्ठ न्यायाधीशांसोबत विचार विनिमय केला पाहिजे.

Scanned by CamScanner

152

**पात्रता** : ① भारताचा नागरिक
② भारताच्या प्रादेशिक क्षेत्रात दहा वर्षे न्यायिक पदावर किंवा.
③ एका किंवा अधिक उच्च न्यायालयात मिळून दहा वर्षे सलग वकीली.
- किमान वयाची अट नाही
- तसेच तो अग्रगण्य कायदेपंडीत असावा ही अट नाही.

शपथ - राज्यपालांसमोर / त्याने नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर.

**कार्यकाल** - ⇒ वयाची 62 वर्षे पूर्ण होईपर्यंत. (१५ वी घटना दु - १९६३ - पूर्वी ६० होते)
त्याच्या वयाबाबतच्या कोणत्याही प्रश्नाबाबत राष्ट्रपती निर्णय घेतो.
सरन्यायाधीशांशी विचारविनिमय करून.

रिक्त होते ⇒ राष्ट्रपतींना उद्देशून राजीनामा.
→ संसदेच्या शिफारशीनुसार
→ सर्वोच्च न्याया. न्यायाधीशपदी नियुक्त झाल्यावर किंवा दुसऱ्या उच्च न्याया. बदली.

**पदच्युती**
① राष्ट्रपतींच्या आदेशानुसार.
(हा आदेश संसदेकडून मिळाल्यानंतरच)
② या निवेदना बरोबरच संसदेच्या दोन्ही गृहांनी विशेष बहुमताने संमत केलेला ठराव असला पाहिजे.
③ गैरवर्तन किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाल्यासच.
⇒ (पदच्युतीचा प्रस्ताव लोकसभेत १०० सदस्यांची व राज्यसभेत ५० सदस्यांची स्वाक्षरी)
⇒ सभापती किंवा अध्यक्ष प्रस्ताव स्विकारतील किंवा नाकारतील.
⇒ तदनंतर त्रिसदस्यीय समिती (सर्वोच्च सर/न्याया, उच्च न्याया मुख्य न्याया, कायदेपंडीत
④ आतापर्यंत एकाही न्याया. पदच्युती नाही.

**वेतन व भत्ते** - संसद ठरवते
मुख्य न्याया २००९ - ३०००० वरून दरमहा ९०,००० -
इतर न्याया २००९ - २६,००० वरून दरमहा ८०,००० पर्यंत.

निवृत्तीवेतन शेवटच्या वेतनाच्या ५०%.

बदली ⇒ राष्ट्रपती सरन्यायाधीशांशी विचार विनिमय करून.
१९९४ - सर्वोच्च न्याया. निर्णय: बदली झालेला न्यायाधीश बदलीच्या आदेशास आव्हान देऊ शकतो.

Scanned by CamScanner

खटला १९९८ ⇒ उच्च न्यायालयाच्या न्याया. बदली करताना सर्वोच्चायाधिशाने सर्वात वरिष्ठ चार न्यायाधिशांच्या मंडळाशी आणि दोन्ही उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांशी विचार विनिमय करणे आवश्यक.

प्रभारी मुख्य न्यायाधिश

→ राष्ट्रपती नियुक्ती

→ उच्च न्याया.च्या न्यायाधिशाला.

पुढील परिस्थितीत ① पद रिक्त

② तात्पुरत्या कालावधीसाठी अनुपस्थित.

③ कामे करण्यास असमर्थ.

अतिरिक्त आणि प्रभारी न्यायाधिश

⇒ दोन वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या तात्पुरत्या कालावधीसाठी

→ आवश्यक पात्रता पूर्ण करण्याला - राष्ट्रपती नियुक्त करतो.

- कारणे → ① कामात तात्पुरती वाढ झाली असेल

② कामे प्रलंबित असतील तर

जेव्हा इतर न्यायाधिश काही कारणामुळे पदाची कामे करू शकत नाही / त्याची तात्पुरत्या कालावधीसाठी प्रभारी मुख्य न्याया. म्हणून नियुक्ती झाली.

→ कायमस्वरूपी न्याया रुजू होईपर्यंत पदावर / किंवा ६२ वर्षापर्यंत.

निवृत्त न्यायाधिश

राज्याच्या उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधिश कधीही त्या किंवा इतर उच्च न्यायाच्या निवृत्त न्यायाधिशाला तात्पुरत्या कालावधीसाठी काम करण्याची विनंती करू शकतो.

→ राष्ट्रपती ठरवील त्यानुसार भत्ते.

→ त्याला अधिकार असतात पण त्याला उच्च न्याया न्यायाधिश मानले जात नाही.

उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य

① नियुक्तीची पद्धत ② कार्यकालाची हमी ③ निश्चित सेवा शर्ती ④ खर्च संचित निधीवर

न्यायाधिशांचे वेतन भत्ते राज्याच्या संचित निधीतून

पर निवृत्ती वेतन — केंद्राच्या —"—

⑤ कामकाजावर चर्चा नाही ⑥ निवृत्तीनंतर व्यवसाय बंदी ⑦ अवमानकर्त्याला शिक्षा.

⑧ कर्मचारी नेमण्याचे स्वातंत्र्य. ⑩ कार्यकारी विभागापासून विभक्त-

⑨ अधिकार क्षेत्र कमी करता येत नाही.

↳ संसद आणि राज्यविधिमंडळ राज्यघटनेत नमूद केलेले उच्च न्याया. अधिकार आणि अधिकार क्षेत्र कमी करू शकत नाही.

इतर बाबतीत —"— शकतात

Scanned by CamScanner

154 उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र आणि अधिकार

⇒ हे वाद मागण्याचे, राज्यातील सर्वात वरिष्ठ न्यायालय आहे.

→ मुलभूत हक्कांचे संरक्षक

→ घटनेचा अन्वयार्थ लावण्याचे काम.

* अधिकार क्षेत्र व अधिकार याबाबत घटनेत तरतुदी नाहीत.

* राज्यघटना लागू होण्यापूर्वीचे अधिकार.

① प्रारंभिक अधिकारक्षेत्र

⇒ अपिल स्वरूपात सुरु झालेला खटला हा प्रारंभिक अधिकार क्षेत्रात येत नाही.

⇒ खालील बाबींसाठी प्रारंभिक अधिकारक्षेत्र.

(i) समुद्र किंवा जहाजाशी संबंधित प्रकरणे, इच्छापत्र, विवाह, घटस्फोट, कंपनी कायदे आणि न्यायालयाचा अवमान

(ii) संसद व राज्य विधीमंडळाच्या सदस्यांच्या निवडणूका बाबतचे विवाद

(iii) महसुलाच्या विषयाबाबत.

(iv) मुलभूत हक्कांची अंमलबजावणी.

(v) कलकत्ता, मुंबई, मद्रास, दिल्ली उच्च न्यायालयांना मोठ्या रकमाबाबत प्रारंभिक दिवाणी अधिकार क्षेत्र.
सन 1973 पूर्वी कलकत्ता, मुंबई, मद्रास — यांना फौजदारी अधिकारक्षेत्र सुद्धा 1973 मध्ये रद्द.

② आदेशाचे अधिकारक्षेत्र

उच्च न्यायालय केवळ आपल्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात येणाऱ्या व्यक्तींस, प्राधिकाऱ्यास, व शासनास रीट आदेश देऊ शकते असे नव्हे तर खटल्याचे कारण त्याच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रात घडले असेल तर उच्च न्यायालय त्याच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्राच्या बाहेरही रिट आदेश देऊ शकते.

उच्च न्यायालयाचा व सर्वोच्च न्यायालयाचा आदेश देण्याचा अधिकार हा राज्यघटनेच्या मुलभूत चौकटीचा भाग आहे त्यामुळे घटना दुरुस्ती करूनसुद्धा हा अधिकार वगळता येत नाही किंवा रद्द करता येत नाही. ⇒ चंद्रकुमार खटला 1997.

③ अपिलाचे अधिकार क्षेत्र

→ दुय्यम न्यायालयांच्या निर्णयावर पुनर्विचार - यामध्ये दिवाणी व फौजदारी विषय येतात.

⇒ पुनर्विचाराचे किंवा अपिलाचे अधिकारक्षेत्र - प्रारंभिक अधिकारापेक्षा व्यापक.

(अ) → दिवाणी खटले,

① जिल्हा न्यायालये, अतिरिक्त जिल्हा न्यायालये, आणि इतर दुय्यम न्यायालयांचे

Scanned by CamScanner

आदेश व निर्णय यांच्या परिछेद्या पुनर्विचाराचे काम थेट उच्च न्यायालयात.
यामध्ये ठराविक रकमेपेक्षा जास्त रकमेच्या दाव्यांसाठी - कायद्याच्या व तथ्याच्या प्रश्नाबाबत.

(ii) जेथे कायद्याचा प्रश्न निर्माण झाला आहे (तथ्याचा नव्हे) अशा प्रकरणी जिल्हा किंवा तत्सम दुय्यम न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध दुसरे अपिल उच्च न्याया.

(iii) कलकत्ता, मुंबई आणि मद्रास याच न्यायालयांतर्गत अपिलाची किंवा पुनर्विचाराची तरतुद आहे

## ② फौजदारी खटले

(I) सत्र किंवा अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिलेली शिक्षा जर सात वर्षापेक्षा अधिककाळाच्या तुरुंगवासाची असेल.

(II) सत्र किंवा अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिलेली देहदंडाची शिक्षा आयोगाने अपिल केले नाही तरी उच्च न्यायालयाने निश्चित केल्या शिवाय अंमलात येत नाही.

## ③ पर्यवेक्षण अधिकार

सैनिकी न्यायालये किंवा न्यायाधिकरणे वगळता उच्च न्यायालयास आपल्या भौगोलिक अधिकार क्षेत्रात असलेली सर्व न्यायालये व न्यायाधिकरणे यांचे पर्यवेक्षण.

त्यासंदर्भात -
(i) माहिती मागवु शकते
(ii) सर्वसाधारण नियम बनवु शकतो
(iii) शेरिफ, कारकून, अधिकारी आणि कायदे व्यावसायिक यांना देण्यात येणारे शुल्क ठरवते.

पर्यवेक्षण अधिकार खालील कारणाने व्यापक :
(i) प्रशासनिक पर्यवेक्षण नसून न्यायिक पर्यवेक्षण
(ii) सुधारणा करण्याचे अधिकार क्षेत्र
(iii) अपिलाशिवाय स्वतः हुनही उच्च न्यायालय कारवाई करु शकते.

## ④ दुय्यम न्यायालयावर नियंत्रण

पुनर्विचाराच्या आणि पर्यवेक्षणाच्या अधिकार क्षेत्रा शिवाय दुय्यम न्यायालयावर प्रशासकीय नियंत्रण

(i) जिल्हा न्यायाधिशांची नियुक्ती, पदनियुक्ती आणि पदोन्नती राज्यपाल उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करतो.

(ii) दुय्यम न्यायालयात प्रलंबित खटला उच्च न्यायालय स्वतः कडे वर्ग करुन घेऊ शकते. (घटनेचा अन्वयार्थ लावण्यासंदर्भातील कायद्याचा प्रश्न)

(iii) उच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा त्यांच्या भौगोलिक अधिकार क्षेत्रातील सर्व दुय्यम न्यायालयांवर बंधनकारक.

Scanned by CamScanner

**अभिलेख न्यायालय :**

① उच्च न्यायालयाचे निर्णय, कामकाज, कृती यांची कायमस्वरूपी नोंद व पुरावे म्हणून नोंद केली जाते.
या नोंदींना साक्षीचे मूल्य असते आणि कोणत्याही दुय्यम न्यायालयात सादर केल्यावर त्यांना आव्हान देता येत नाही.

② न्यायालयाचा अवमान केल्यास साधी कैद किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा देण्याचा अधिकार. अवमान दिवाणी किंवा फौजदारी असू शकतो.

**न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार**

कायदेमंडळाने केलेल्या कायद्यांचे व केंद्र व राज्य सरकारच्या कार्यकारी आदेशांच्या घटनात्मक वैधतेचे परिक्षण करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार म्हणजे न्यायिक पुनर्विलोकन.
कलम १३ व २२६ ने हा अधिकार घटनेने उच्च न्यायालयाला दिला आहे.

खालील ३ कारणांसाठी पुनर्विलोकन.

① मुलभूत हक्कांचे उल्लंघन होत असेल
② ज्या अधिकारात ते बनविले आहेत त्या अधिकार क्षेत्राच्या बाहेरचे असतील
③ घटनात्मक तरतुदींच्या विरोधात असतील.

४२ वी घ.दु. १९७६ ⇒ उच्च न्यायालयाने कोणत्याही केंद्रीय कायद्याच्या घटनात्मक वैधतेचे परिक्षण करण्यावर बंदी.

४३ वी घ.दु. १९७७ ⇒ वरील बंदी रद्द.

Scanned by CamScanner